निवडक महानगर

## मुरुडमध्ये पर्यटन महोत्सवाला सुरुवात

**मुरूड-जंजिरा :** महेंद्र दळवी सामाजिक फाऊंडेशन व मुरुड-जंजिरा पर्यटन महोत्सवाची सुरुवात बैलगाडी स्पर्धेने करण्यात आली. हजारोच्या संख्येने पर्यटक व स्थानिक नागरिक मुरूड समुद्रकिनारी जमले होते. ग्रामीण शहरी भागातील लोकांनी बैलगाडी स्पर्धा पाहण्यासाठी तुफान गर्दी केली होती. हौशी लोकांसाठी बैलगाडी स्पर्धेचे विशेष आयोजन करण्यात आले होते. आमदार महेंद्र दळवी यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून बैलगाडी स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी शिवसेनेचे रायगड जिल्हा संपर्क प्रमुख प्रकाश देसाई, जिल्हा अध्यक्ष राजा केणी, माजी सरपंच भाई सुर्वे, जिल्हा उपप्रमुख भरत बेलोसे, मुरूड शहर प्रमुख संदीप पाटील, निलेश घाटवळ, सागर चौलकर, सुबुक दर्जी, पर्यटन महोत्सवाचे उप कार्याध्यक्ष वीरेंद्र भगत, प्रकाश सरपाटील, माजी गिरीश साळी, जिल्हा संघटिका शुभांगी करडे, आदी मान्यवर उपस्थित होते.



## वाशी ब्रीज ते कुलाबा पोहून कृष्णाने दिला सरत्या वर्षाला निरोप

**कल्याण :** कल्याणमधील सर्वोदय गार्डन येथे राहणाऱ्या कृष्णा अमित वायकरने वाशी ब्रीज ते कुलाबा ३० किलोमीटर पोहून सरत्या वर्षाला निरोप दिला आहे. ३० डिसेंबर रोजी रात्री २ वाजून ४५ मिनिटांनी समुद्र देवतेची पूजा करून महाराष्ट्र राज्य हौसी जलतरण संघटनेचे निरीक्षक नील लब्दे यांच्या देखरेखीखाली जुना वाशी ब्रीजपासून पोहण्यास सुरुवात केली. सगळीकडे अंधाराचे साम्राज्य होते, पहाटेची वेळ असल्यामुळे थंडी जाणवत होती. सकाळच्या सुमारास वातावरणातील बदलामुळे समुद्रातील पाण्याच्या दिशा बदलतात. त्यामुळे थोडा त्रास होत होता. मात्र कृष्णाची जिद्द चिकाटी आणि मेहनत आत्मविश्वास याच्या जोरावर सकाळी कुलाबा रीफला ६ तास ४० मिनिटात पोहचला. फ्रान्सची इंग्लिश खाडी पोहायचे असे कृष्णाचे स्वप्न आहे.

# नवी मुंबईत फायनान्शियल इंटेलिजन्स युनिटची स्थापना

**नवी मुंबई :** आर्थिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस होणारी वाढ तसेच त्याचे गुंतागुंतीचे स्वरूप व त्यामुळे मोठ्या प्रमाणात होत असलेले नागरिकांचे आर्थिक नुकसान याचा विचार करून नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात घडणाऱ्या आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी फायनान्शियल इंटेलिजन्स युनिटची स्थापना करण्यात आली आहे. या युनिटच्या माध्यमातून नवी मुंबईत घडणाऱ्या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांची अगोदरच माहिती काढून त्यांना प्रतिबंध करण्यात येणार आहे. त्याचबरोबर समाजामध्ये याबाबत जनजागृती देखील करण्यात येणार आहे.

नवी मुंबईच्या हद्दीत आर्थिक गुन्ह्यांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून या गुन्ह्यांचे स्वरूप गुंतागुंतीचे असल्याचे तसेच त्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होत असल्याचे आढळून आले आहे. अशा




गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या आदेशाने, अप्पर पोलीस आयुक्त दीपक साकोरे व गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखेंतर्गत फायनान्शियल इंटेलिजन्स युनिटची स्थापना करण्यात आली आहे.

सदर फायनान्शियल इंटेलिजन्स युनिट नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत घडणाऱ्या आर्थिक स्वरूपाच्या गुन्ह्यांची अगोदरच माहिती काढून त्यांना प्रतिबंध करणार आहे. त्याचबरोबर समाजामध्ये याबाबत जनजागृती करण्याचे देखील काम करणार आहे.

या युनिटच्या वतीने शुक्रवारी पनवेलमधील मंथन हॉल येथे आर्थिक गुन्ह्यांमध्ये होणाऱ्या फसवणुकीबाबत पनवेल तालुक्यातील सर्व पोलीस पाटलांकरिता जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पोलीस निरीक्षक सतीश जाधव, पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी पॉन्जी स्कीम, मनी सर्क्युलेशन, चिटफंड, बँकिंग गुन्हे, गृहनिर्माण गुन्हे, जॉब रॅकेटींग अशा वेगवेगळ्या प्रकारच्या आर्थिक गुन्ह्यांविषयी माहिती देण्यात आली.

### नागरिकांनी फसव्या जाहिरातींना फसू नये

आर्थिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त डॉ. विशाल नेहुल यांनी यासंदर्भातील फसव्या जाहिरातींना बळी न पडता त्याची सत्यता पडताळावी व सावधगिरी बाळगावी. एखाद्या नागरिकांची आर्थिक फसवणूक झाल्यास किंवा अशा फसव्या योजना निदर्शनास आल्यास त्याबाबत नवी मुंबईतील आर्थिक गुन्हे शाखेकडे किंवा जवळच्या पोलीस ठाण्यामध्ये तक्रार दाखल करावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमास पोलीस पाटील, महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच अशा प्रकारच्या आर्थिक स्कीममध्ये पैशांची गुंतवणूक करताना कोणकोणत्या प्रकारची खबरदारी घ्यावी, स्कीम राबवणाऱ्यांकडे कोणत्या परवानगी असणे आवश्यक आहे. तसेच सदरच्या गुंतवणूक स्कीम शासन मान्य असल्याचे शासनाच्या पोर्टलवर तपासूनच त्यामध्ये गुंतवणूक करण्याबाबत माहिती दिली.

# स्वतंत्र भारत पक्षाचे राज्यव्यापी धरणे आंदोलन

**मुंबई :** शेतकऱ्यांना कर्जमुक्ती, वीज प्रश्न, पीक विमा, वन्यप्राण्यांपासून होणारे पिकांचे नुकसान व आयात-निर्यात धोरण या विषयांकडे राज्य शासनाचे लक्ष वेधण्यासाठी स्वतंत्र भारत पक्षाचे नेतृत्वाखाली, दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी राज्यव्यापी धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्वतंत्र भारत पक्षाचे अध्यक्ष मंडळाचा महाराष्ट्र दौरा २२ नोव्हेंबरपासून सुरू होऊन ३० डिसेंबर २०२३ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर येथे दौऱ्याचा समारोप करण्यात आला. श्रीरामपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत अनिल घनवट यांनी राज्यव्यापी आंदोलनाची घोषणा केली. पत्रकार परिषदेत घनवट यांच्या समवेत स्वतंत्र भारत पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष मधुसूदन हरणे, महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा सीमा नरोडे उपस्थित होत्या.

शेतीमाल व्यापारातील सरकारच्या अतिरेकी हस्तक्षेपामुळे शेतमालाचे भाव पडतात परिणामी शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. शेतीसाठी मर्यादित वेळेत वीजपुरवठा होतो, तो ही रात्री व अपुऱ्या दाबाने केला जातो. वीजबिल वसुलीसाठी पूर्ण गावाचा वीजपुरवठा केला जातो. शेतकऱ्यांच्या या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी, स्वतंत्र भारत पक्षाचे नेतृत्वाखाली एक दिवसीय राज्यव्यापी धरणे आंदोलन करणार असल्याची माहिती देण्यात आली. देशातील शेती प्रश्नाबरोबरच बेरोजगारी, गुन्हेगारी, कायदा सुव्यवस्था, महिला सुरक्षा, भ्रष्टाचार, महागाई व अवास्तव कर आकारणीसारखे प्रश्न सोडवायचे असतील तर स्वतंत्र भारत पक्षाने पुरस्कृत केलेल्या खुल्या व्यवस्था शिवाय पर्याय नाही असे मत सीमा नरोडे यांनी व्यक्त केले. बैठकीला नगर जिल्हा शेतकरी संघटनेचे अध्यक्ष मधुकर शिंदे, ॲड. रावसाहेब करपे, कारभारी कणसे, बापूसाहेब आढाव, डॉ. संजय कुलकर्णी, बाळासाहेब सातव, इंदुबाई ओहोळ, संजय करपे, रावसाहेब निमसे, ज्ञानदेव गुळवे,, प्रकश जाधव, मधुकर काकड, श्रीराम त्रिवेदी, बाळासाहेब घोगरे आदी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# भूसंपादनाचा शेरा लागूनही मोबदल्यापासून वंचित

## दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आंदोलनाचा पवित्रा

**बदलापूर :** रेल्वेच्या तिसऱ्या व चौथ्या मार्गिकेच्या कामासाठी सुमारे दोन वर्षांपासून भूसंपादन सुरू आहे. यात बदलापूर स्टेशन परिसरातील कुळगाव येथील जमिनीच्या पूर्ण गटावर भूसंपादनाचा शेरा लागला आहे. त्यामुळे शेकडो भूखंड बाधित झाले आहेत. यात दोन वर्षे उलटूनही कोणत्याही प्रकारचा मोबदलाही मिळालेला नाही. त्यामुळे हवालदिल झालेल्या भूखंडधारकांनी आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे.

गेल्या दोन वर्षांपासून कल्याण बदलापूर तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गासाठी भूसंपादन सुरू आहे. बदलापुरात यासाठी सर्वेक्षण करण्यात आल्यानंतर स्टेशन परिसरातील कुळगाव येथील जवळपास सर्वच भूखंडांच्या सातबारावर भूसंपादनासाठी समाविष्ट असा शेरा लागला आहे. हा शेरा नोंद करताना सातबारावर स्वतंत्र नोंद न करता सरसकट संपूर्ण गटावर हा शेरा लागला आहे. त्यामुळे या गटात येणाऱ्या सर्वच सर्व जमिनी बाधित झाल्या आहेत.

भूखंडांसह अनेक रहिवासी सोसायट्यांचाही समावेश आहे. भूसंपादनासाठी समाविष्ट असा शेरा लागल्यामुळे या भूखंडांचा विकास करणे तसेच भूखंडांवर असलेल्या सोसायट्यांचा पुनर्विकास रखडला आहे.

दुसरीकडे सुमारे दोन वर्षे उलटूनही या भूखंडांच्या भूसंपादनाचा कोणताही मोबदला भूखंडधारकांना मिळालेला नाही. या पार्श्वभूमीवर बदलापुरातील सामाजिक कार्यकर्ते हर्षद चंद्रकांत भोपी सातत्याने या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहेत.

उल्हासनगर प्रांत कार्यालयाशी संपर्क साधला असता, उपअधीक्षक भूमिअभिलेख, अंबरनाथ यांना ३० मे २०२३ रोजी पोट हिस्सा मोजणी करण्याबाबत पत्र दिलेले असून त्यांच्याकडून अद्याप या कार्यालयात पोट हिस्सा मोजणी अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर या भूखंडाच्या सातबारावरील भूसंपादनात समाविष्ट, असा शेरा रद्द करता आलेला नाही.

# शालेय विद्यार्थ्यांचा रिक्षातील जीवघेणा प्रवास थांबणार का?

## मनसेकडून कारवाईची मागणी

**शंकर जाधव/डोंबिवली :**

डोंबिवलीतील अनेक खासगी शाळेतील बससेवा परवडणारी नसल्याने पालकवर्ग आपल्या पाल्यांसाठी रिक्षाचा पर्याय निवडत असतात. सुरक्षिततेची कोणतीही सोय नसल्याने शालेय विद्यार्थ्यांसाठी रिक्षाचा प्रवास धोकादायक असल्याचे माहीत असूनही पालकवर्गाला याचे गांभीर्य नाही.

शाळा व्यवस्थापनाकडून उपलब्ध असलेली बससेवा महागडी असते. शालेय बसमध्ये सुरक्षिततेची काळजी घेतली जात असून वेळोवेळी उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून तपासणी केली जाते. मात्र रिक्षातून सुरक्षिततेची कोणतीही काळजी घेतली जात नाही. तसेच संकटसमयी काय करावे याची माहिती रिक्षाचालकांना नसते. त्यामुळे आगामी काळात रिक्षाचालकांना विद्यार्थ्यांची वाहतूक मनाई करावी, अशी मागणी मनसेच्या वतीने करण्यात आली आहे. प्रत्येक शाळेची स्वतःची बससेवा उपलब्ध आहे. मात्र ती सेवा थोडी महागडी असल्यामुळे पालकांना ती परवडणारी नसते. त्यामुळे पालक आपल्या पाल्यांसाठी रिक्षा वाहतुकीचा पर्याय निवडताना दिसतात. मात्र रिक्षाचालक अवैधपणे विद्यार्थ्यांची कोंबाकोंबी करतात. त्यामुळे अपघात होण्याची भीती मोठ्या प्रमाणात व्यक्त केली जाते.

२० डिसेंबर रोजी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या रिक्षाचा अपघात झाला होता. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रवासाचा प्रश्न उपस्थित केला गेला आहे. यावर मनसेने लक्ष दिले असून मनविसे डोंबिवली विद्यार्थी सेनेचे डोंबिवली शहर अध्यक्ष मिलिंद म्हात्रे यांनी अशा रिक्षांवर उपप्रादेशिक परिवहन विभागाकडून कारवाईची मागणी केली आहे.

# स्वामी अभिषेक ब्रह्मचारी यांच्याकडून पंतप्रधान मोदींच्या कामाची प्रशंसा

**स्वप्निल मिश्रा / मुंबई**



गिरगावच्या नेमाणी बारी येथे युवा चेतनातर्फे आयोजित करण्यात आलेल्या श्री विद्या लक्षार्चन समारोहाच्या माध्यमातून भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून स्थापित केल्या जाणाऱ्या रामराज्याचा संदेश प्रसारित होत आहे. या तिन दिवसीय कार्यक्रमाचा समारोप स्वामी अभिषेक ब्रह्मचारी, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, न्यायमूर्ती सुनील शुक्रे, युवा चेतनाचे राष्ट्रीय संयोजक रोहित कुमार सिंग आणि अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी माता ललिता यांची आरती करण्यात आली. भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून रामराज्याची स्थापना होत आहे असे म्हणत, स्वामी अभिषेक ब्रह्मचारी यांनी मोदी गरीबांच्या कल्याणासाठी करत असलेल्या कामाची प्रशंसा केली.

### तीन दिवसीय श्री विद्या लक्षार्चन समारोह

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, युवा चेतना आयोजित श्री विद्या लक्षार्चन या कार्यक्रमामुळे व्यक्तीला समाजासाठी सकारात्मक योगदान देण्यास बळ मिळेल. आपले पंतप्रधान मोदी समाजातील शेवटच्या व्यक्तीबद्दल काळजी करतात आणि २२ जानेवारी रोजी प्रत्येकासाठी नवीन स्वातंत्र्याचे भविष्यवाणी केली होती. ही एक नवीन क्रांती आहे जी भारतमातेच्या वैभवात वाढ करत राहील, असे ते म्हणाले.

स्वामी सर्वेश्वरानंद यांनी जागतिक पातळीवर अग्रगण्य देश म्हणून आपल्या देशाच्या पुनरुत्थानाचे श्रेय माता ललिता आणि भगवान गणेश यांना दिले. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांनी भविष्यात आपला देश महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास व्यक्त केला.


## जाहीर सूचना

नोंद घ्यावी की, माझ्या अशील सौ. रिनू सिन्हा या मौल्यवान मोबदल्याद्वारे विकासक मे. लोखंडवाला कटारिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. यांच्याकडून लोअर परेल विभाग, जे. आर. बोरिचा मार्ग, ऑफ एन. एम. जोशी मार्ग, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०११ चा सीएस क्र. १ (भाग) आणि २ (भाग) धारण केलेल्या जमिनीच्या प्लॉटवर वसलेल्या "मिनर्व्हा" या इमारतीच्या ए विंगमधील ८८ व्या मजल्यावरील (मंजूर योजनेनुसार ७६ वा मजला) ड्युप्लेक्स सदनिका क्र. ८८०१ ही निवासी जागा खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

सदर सदनिका किंवा तिच्या कोणत्याही भागामध्ये विक्री, भेट, भाडेपट्टी, भाडेकरू, अदलाबदल, गहाणवट, वारसा, प्रभार, धारणाधिकार, न्यास, ताबा, वहिवाट, जप्ती या मार्गे किंवा अन्यथा कोणत्याही हितसंबंधाचा दावा करणाऱ्या सर्व व्यक्तींनी त्याबाबत निम्नस्वाक्षरीकार यांना ७ ते ११, वर्धमान चेंबर्स, तळमजला, कावसजी पटेल मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ येथील कार्यालयात यामधील दिनांकापासून १४ दिवसांच्या आत सूचित करणे आवश्यक आहे, असे न केल्यास, असा दावा, जर असल्यास, सोडून दिला असे समजण्यात येईल.

**सदनिकेची अनुसूची**

लोअर परेल विभाग, जे. आर. बोरिचा मार्ग, ऑफ एन. एम. जोशी मार्ग, महालक्ष्मी, मुंबई - ४०० ०११ चा सीएस क्र. १ (भाग) आणि २ (भाग) धारण केलेल्या जमिनीच्या प्लॉटवर वसलेल्या "मिनर्व्हा" या इमारतीच्या ए विंगमधील ८८ व्या मजल्यावरील (मंजूर योजनेनुसार ७६ वा मजला) ड्युप्लेक्स सदनिका क्र. ८८०१.

**दिनांक ३१ डिसेंबर, २०२३.**

सही/-
**ॲड. राकेश के. अग्रवाल**
७ ते ११, वर्धमान चेंबर्स, तळमजला, कावसजी पटेल मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१
ईमेल: rakeshkhushi2007@gmail.com
मोबाईल: ०९८६९ २७१९२०



## जाहीर सूचना

**(पूर्वग्रह न ठेवता)**

सूचना याद्वारे देण्यात येते की, ओल्ड कॅरल रोड, बाळाशेठ मदुरकर मार्ग, एल्फिन्स्टन, मुंबई - ४०००१३ स्थित प्राईम प्लाझा प्रिमायसेस को-ऑप. सोसा. लि. म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारत क्र.१ मधील तळमजल्यावरील मोजमापित १६५० चौ.फू. युनिट क्र. ४-बी/१ चे मालक **राजेंद्र एच. गंजू** यांच्याकडून सदर युनिट खरेदी करण्यास माझे अशील इच्छुक आहेत आणि सदर इमारत नोंदणी जिल्हा आणि उपजिल्हा मुंबईतील लोअर परेल विभागाचा सीएस क्र. ८४४ (भाग), १/८४४ धारक जमिनीवर बांधण्यात आली आहे. (यानंतर "सदर इमारत" असा उल्लेख).

तसेच, सदर मिळकत खरेदी करण्याच्या संदर्भातील मूळ (१) द न्यू स्टॅण्डर्ड इंजिनियरिंग कंपनी लि. (विक्रेता) आणि गिरीशकुमार हिमतलाल वालिआ आणि हेमलता हसमुखराय वालिआ, मे. वालिआ ॲण्ड कं.चे भागीदार (खरेदीदार) यांच्यात झालेला १९.१२.१९८७ दिनांकित करार (२) गिरीशकुमार हिमतलाल वालिआ आणि हेमलता हसमुखराय वालिआ, मे. वालिआ ॲण्ड कं.चे भागीदार (विक्रेता) आणि आणि राजेंद्र गंजू (खरेदीदार) यांच्यातील ११.०९.१९९१ दिनांकित करार हरवले, गहाळ झाले आहेत आणि आतापर्यंत सापडू शकलेले नाहीत.

सर्व व्यक्तीं ज्यांना येथे वरील नमूद हरवलेले मूळ दस्तावेज सापडल्यास किंवा सर्व व्यक्तींना सदर मिळकत किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संदर्भात कोणतेही दावे किंवा हक्क जसे की, वारसा, शेअर, विक्री, गहाण, भाडेपट्टा, धारणाधिकार, परवाना, बक्षीस, ताबा, अदलाबदल, प्रभार, प्रलंबित वाद, निर्वाह, सुविधाधिकार, न्यायालय आदेश किंवा कोणतेही भार किंवा अन्यकाही दावे असल्यास निम्नस्वाक्षरीकारांना सदर तसे दावे लिखित सर्व पूरक कागदपत्रांच्या मूळ प्रमाणित प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. कसूर केल्यास, तशा व्यक्तींचे दावे जर असल्यास, ते इच्छेनुसार परित्यागित, त्यागित समजले जातील आणि आमचे अशील/अशीलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक: ३१/१२/२०२३
ठिकाण: मुंबई

सही/-
**श्री. रवींद्र कुमार एस. यादव**
**एम.ए., एलएल.एम.,**
द्वारे गिरीश पी. जैन, ॲण्ड कं.
१०१-१०२ पीस हेवन एन एम काळे मार्ग,
दादर (पश्चिम), मुंबई - ४०००२८



## दी नॅशनल को-ऑप. बँक लिमिटेड

नोंदणी आणि प्रशा. कार्यालय: २१४, रहेजा सेंटर, फ्री प्रेस जर्नल रोड, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०००२१,
वसुली विभाग: प्लॉट क्र. ८-सी, सेक्टर-१३, १ ला मजला, खांदा कॉलनी, नवीन पनवेल (पश्चिम), ४१०२०६,
दूरध्वनी क्र. ०२२-२७४५८६२८, ईमेल पत्ता: recovery@ncbmumbai.com

**एनसीबी/एचओ/आरईसी/२९१/२०२३-२४** **रजि. एडी** **दिनांक: २८.१२.२०२३**

**मे. समर्थ कृपा जनरल स्टोअर, प्रोप्रा. श्री. अरविंद बजरंग पिंगळे**
**व्यवसायाचा पत्ता:** दुकान क्र. ४, तळ मजला, पुष्प किरण को-ऑप. हाऊ. सोसायटी, प्लॉट क्र. ३७ए, सेक्टर क्र. १२, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९. **निवासी पत्ता:** फ्लॅट क्र. ४०१, गणेश कृपा अपार्टमेंट, प्लॉट क्र. ११३, सेक्टर-१४, कामोठे, नवी मुंबई-४१०२०९.

महोदय,

विषय: सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंटऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना

तुमच्या विनंतीनुसार तुम्हाला बँकेच्या नावे तारण हितसंबंध निर्माण करून विविध मालमत्ता सापेक्ष तिच्या खांदा कॉलनी शाखेमार्फत २३.०३.२०१८ रोजी बँकेने **खाते क्र. एमटीएलएन/११२ द्वारे मुदत कर्ज सुविधा मंजूर केली** आणि रु. १०.०० लाख वाटप केले. सदर मुदत कर्ज सुविधा आणि तुमच्याद्वारे निष्पादित तारण करार/दस्तावेजांचा संबंधित तपशील अनुक्रमे परिशिष्ट 'ए' आणि 'बी' मध्ये नमूद करण्यात आला आहे. तुम्ही सदर करार/दस्तावेजांच्या अटींमध्ये सदर वित्तीय सहाय्य परत करण्याच्या उपक्रमासह वित्तीय सहाय्य घेतलेले आहे.

पुढे सदर वित्तीय सहाय्य घेते वेळी बँकेच्या नावे तारण हितसंबंध निर्माण करून नामाधिकार विलेख/रजिस्टर्ड गहाण जमा करून गहाण निर्माण केलेले आहे. अशा गहाणाशी संबंधित दस्तावेजसुध्दा परिशिष्ट 'बी' मध्ये नमूद करण्यात आले आहे.

तारण मालमत्ता संबंधित तपशील परिशिष्ट 'सी' मध्ये विशेषतः नमूद करण्यात आला आहे. सदर वित्तीय सहाय्य/पत सुविधेचे चलनवलन अनियमित बनले आहे आणि कर्ज वेळोवेळी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या मालमत्ता वर्गीकरणाशी संबंधित निर्देश/मार्गदर्शक तत्त्वानुसार **०६.०६.२०२०** रोजी 'नॉन परफॉर्मिंग ॲसेट' म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहे.

सदर वित्तीय सहाय्य यांच्या वैयक्तिक हमीद्वारेसुध्दा सुरिक्षत आहे.
(१) श्री. सुदाम कारभारी कानवडे
(२) सौ. भग्यश्री सुदाम कानवडे

वारंवार विनंती करूनही तुम्ही सदर थकबाकी/थकीत दायित्वे अदा करण्यास कसूर आणि टाळाटाळ केलेली आहे. त्यामुळे बँक सदर सूचनेच्या तारखेस ६० दिवसांत बँकेसाठी येथील खालील नमूद तुमचे संपूर्ण दायित्व सोडविण्यासाठी सदर सूचना जारी करून ''सदरहू अधिनियमाच्या'' कलम १३(२) अन्वये तुम्हाला याद्वारे बोलाविणे करीत आहे.

३०.११.२०२३ रोजीस तुमचे थकीत दायित्व आणि बँकेला देणे **रु.३,९३,१७७.०० (रुपये तीन लाख त्र्याण्णव हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र)** इतके आहे आणि तुम्ही अनुषंगिक खर्च, परिव्यय, प्रभार इ. सह एकत्रित वरील सदर रकमेवरील ०१.१२.२०२३ पासूनचे पुढील व्याजसुध्दा अदा करण्यासाठी जबाबदार आहात.

जर तुम्ही सदरहू अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये सदर सूचनेसुनार वरील नमूदनुसार पुढील व्याज/अनुषंगिक खर्च, परिव्यय यासह एमटीएलएन/११२ मधील तुमचे थकीत दायित्व आणि बँकेला देणे **रु. ३,९३,१७७.०० (रुपये तीन लाख त्र्याण्णव हजार एकशे सत्त्याहत्तर मात्र)** ची वरील सदर रक्कम अदा करण्यास कसूर केल्यास बँक सदरहू अधिनियमाच्या इतर प्रयोज्य तरतुदीन्वये आणि कलम १३ च्या पोटकलम (४) अन्वये तपशील दिलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर करेल.

तुम्हाला ही सुध्दा सूचना देण्यात येते की, कलम १३ च्या पोटकलम १३ नुसार तुम्ही बँकेच्या लेखी सहमतीशिवाय परिशिष्ट ''सी'' मध्ये तपशील दिलेल्या सदर तारण, मालमत्ता, विक्री, भाडेपट्टा किंवा अन्यथा मार्गाने हस्तांतर करू शकत नाही.

सदर **सूचना** ही कायद्याच्या इतर प्रयोज्य तरतुदीन्वये आवश्यक मानल्यानुसार अशी अन्य कारवाई किंवा कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी बँकेच्या हक्काला बाधा येऊ न देता देण्यात येत आहे.

आपला स्नेहांकित
**(सौ. शैला एस. पाटील)**
**प्राधिकृत अधिकारी**

**यांना प्रत:**
१) श्री. सुदाम कारभारी कानवडे
**निवासी पत्ता:** जी-१३५, खोली क्र. ६, स्मितल सीएचएसएल, निमिशा हॉस्पिटल मागे, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०.
२) सौ. भाग्यश्री सुदाम कानवडे
**निवासी पत्ता:** जी-१३५, खोली क्र. ६, स्मितल सीएचएसएल, निमिशा हॉस्पिटल मागे, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई-४१०२१०.

तुम्हाला तुमच्याद्वारे निष्पादित हमीच्या अटीनुसार सूचनेत नमूद केलेली रक्कम अदा करण्याचा सल्ला देण्यात येत आहे.
**(सौ. शैला एस. पाटील)**
**प्राधिकृत अधिकारी**

**परिशिष्ट 'ए'**

| सुविधेचे नाव | ३०.११.२०२३ रोजीस व्याजासह थकबाकी |
|---|---|
| मुदत कर्ज कर्ज खाते एमटीएलएन-११२ २३.०३.२०१८ रोजी मंजुर | रु. ३,९३,१७७.०० (रुपये तीन लाख त्र्याण्णव हजार एकशे सत्याहत्तर मात्र) |

**परिशिष्ट ''बी''**
**(गहाण निर्माण केल्याचे सर्व पुरवणी दस्तावेज आणि कागदोपत्री पुराव्यांसह तारण दस्तावेजांचा तपशील)**

| अ. क्र. | दस्तावेजाचे नाव | निष्पादनाची तारीख | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| | एमटीएलएन-११२ | | |
| १ | डिमांड प्रॉमिसरी नोट | ०५.०४.२०१८ | रु. १०,००,०००.०० |
| २ | कर्ज करार | ''-'' | ''-'' |
| ३ | लिएन आणि सेट ऑफचे | ''-'' | ''-'' |
| ४ | हमीपत्र | ''-'' | ''-'' |
| ५ | हमीदार/सहकर्जदारांद्वारे लिएन आणि सेट ऑफचे पत्र | ''-'' | ''-'' |

**परिशिष्ट-सी**

**भाग-I बँकेकडील प्राथमिक तारणांचा तपशिल :-**
मालमत्तेचे नाव आणि तिचे वर्णन
**न्याय्य गहाणखत**
''पुष्प किरण को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि.'' प्लॉट क्र. ३७/ए, सेक्टर-१२, कामोठे, तालुका पनवेल जिल्हा रायगड नावाच्या इमारतीमधील क्षेत्र मोजमपित साधारण ४२.३९० चौ.फू. सह क्षेत्र मोजमपित साधारण १२६ चौ.फू. चटई किंवा १५१ चौ.फू. बिल्टअप.

**वरील मिळकतीच्या गहाणासाठी दस्तावेजांचा तपशिल :**
१) मूळ नोंदणी पावती क्र.३६७७ आणि इंडेक्स-II सह अ. क्र. उरण-०३६७७-२००६ द्वारे नोंदणीकृत **मे. बंसल बिल्डर्स आणि सौ. भग्यश्री सुदाम कानवडे** दरम्यान निष्पादित दि. १५/०६/२००६ रोजीचा मूळ विक्री करार.
२) दिनांक १ मे, २०१३ रोजीच्या सदर फ्लॅटच्या संदर्भातील शेअर प्रमाणपत्र क्र. २५ च्या संदर्भातील **सौ. भग्यश्री सुदाम कानवडे** यांच्या नावातील सोसायटीद्वारे जारी मूळ शेअर प्रमाणपत्र.
३) दिनांक २८.०३.२०१८ रोजीची पुष्प किरण को-ऑप. हाऊसिंग सोसायटी लि. द्वारे जारी गहाणासाठी सोसायटीची एनओसी.
४) दिनांक २९.०३.२००७ रोजीचा भोगवटा प्रमाणपत्र संदर्भ क्र. सिडको/बीपी/एटीपीओ/६५३ ची प्रत.
५) दिनांक २४.०५.२००६ रोजीचे सौ. भग्यश्री सुदाम कानवडे आणि श्री. सुदाम के. कानवडे यांना मे. बंसल बिल्डर्स द्वारे जारी वाटप पत्र.
६) दिनांक १८.०४.२०१८ रोजीच्या पावती क्र. ६९४ सह दस्तावेज क्र. पीएनएल-३-६८५-२०१८ द्वारे नामाधिकार विलेख जमा करुन गहाण कळविल्याची सूचना.
७) मे. बंसल बिल्डर्स द्वारे जारी मूळ प्रदानाची पावती दिनांक १६.०५.२००६ रोजीची रु. १,००,०००/- चा पावती क्र. ०५४, २५.०५.२००६ रोजीची रु. १,१५,०००/- चा पावती क्र. ०५८, २६.०५.२००६ रोजीची रु. १,५५,०००/- चा पावती क्र. ०५७, १६.०६.२००६ रोजीची रु. १०,०००/- चा पावती क्र. ६०, ०५.०१.२००७ रोजीची रु. २४,०००/- चा पावती क्र. २२० आणि ०५.०१.२००७ रोजीची रु. १०,०००/- चा पावती क्र. २२१.



OMKARA ASSETS RECONSTRUCTION Pvt. Ltd.

## ओमकारा ॲसेटस रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड

**कॉर्पोरेट कार्यालय:** कोहीनूर स्केअर, ४७ वा मजला, एन. सी. केळकर मार्ग, आर. जी. गडकरी चौक, दादर पश्चिम, मुंबई ४०००२८. संपर्क क्र. ९७७३४०६१७५

**[जोडपत्र - IV-ए] [नियम ८(६) ची परंतुक पाहावे)}**

**स्थावर मिळकतीच्या विक्रीसाठी विक्री सूचना**
**[नियम ८(६) सहवाचता नियम ९(१) च्या तरतुदी पहा )}**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) चे परंतुका सह वाचत सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शीअल ॲसेटस अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**

सर्वसामान्य जनता आणि विशेषकरून कर्जदार **मे.कमलधाम वृध्दाश्रम आणि कल्याणकारी संस्था आणि हमीदार श्रीमती पौर्णिमा सुधीर कबरे, श्री. सुधीर मोहन कबरे** यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेल्या स्थावर मिळकती तारणी धनकोंकडे म्हणजेच ओमकारा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रा. लि. (ओएआरपीएल) गहाण/भारग्रस्त आहेत, ज्यांचा सांकेतिक कब्जा ओमकारा एआरसी सिक्युअर्ड क्रेडिटर्सचे प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे, १०.१२.२०२० रोजीसची **रु. ९६,६८,८९२.००/- (रुपये श्याहण्णव लाख अडुसष्ट हजार आठशे ब्याण्णव मात्र)** सह प्रदानाच्या तारखेपर्यंतचे व्याज, खर्च, परिव्यय, प्रभार इ. च्या वसुलीकरीता ''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे'' व ''कोणत्याही मदतीशिवाय'' तत्वाने १६.०१.२०२४ रोजीस स. ११.०० वा. विकली जाणार आहेत. (बोली सादरीकरणाकरीता अंतिम तारिख आणि वेळ: १५.०१.२०२४ रोजीस सायं ६.०० पर्यंत).

मे. ओमकारा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेड ही वरील कर्जदार आणि सह-कर्जदार यांची तारणी धनको आहे.

मे. ओमकारा ॲसेट रिकन्स्ट्रक्शन प्रायव्हेट लिमिटेडने (ओमकारा पीएस/१७/२०२०-२१ ट्रस्टचे एक ट्रस्टी म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत) २८.०१.२०२१ दिनांकित अभिहस्तांकन कराराद्वारे वरील सदर कर्जदार/हमीदार यांच्याकडील वरील संपूर्ण थकबाकी ठाणे जनता सहकारी बँकेकडील तारणासह संपादन केली आहे.

स्थावर मिळकत, राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम आणि ज्ञात भार (काही असल्यास) चे वर्णन खालीलप्रमाणे:

| मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | इअर |
|---|---|---|
| मे.कमलधाम वृध्दाश्रम आणि कल्याणकारी संस्था, गाव पाले, एमआयडीसी अंबरनाथ, तालुका अंबरनाथ, तालुका अंबरनाथ, जिल्हा ठाणे ४२१५०१ सर्व्हे क्र. ८४(पैकी) मोजमोपित २७४० चौ.मी. समतुल्य गहाण जमीन (सांकेतिक ताबा) | रु. ३,४३,००,०००/- | रु. ३४,३०,०००/- |
| **ई-लिलावाची तारीख आणि वेळ:-** १६.०१.२०२४ रोजी स. ११.०० वा. ते दु. २.०० | | |
| **किमान बोली वाढीची रक्कम:-** रु. १,००,०००/- (रुपये एक लाख मात्र) | | |
| **सहभागी होण्याचे बोली पत्र/केवायसी दस्तावेज/इअरचा पुरावा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** १५.०१.२०२४ रोजी सं. ६.०० वा. पर्यंत | | |
| **मिळकतीचे निरीक्षण:-** १०.०१.२०२४, स. ०१.०० ते दु. ०४.०० दरम्यान | | |
| **ज्ञात दायित्व-** ज्ञात नाही. | | |

सदर प्रकाशन सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) सहवाचता ९(१) अंतर्गत कर्जदार/सह-कर्जदारांना पंधरा दिवसांची सूचना.

**विक्रीच्या तपशिलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया https://omkaraarc.com/auction.php मध्ये पुरवण्यात आलेली लिंक पाहावी. प्राधिकृत अधिकारी संपर्क तपशिल (प्रतीक्षा पटेल संपर्क क्र. ९७७३४०६१७५ आणि राजेंद्र देवर्डे ९३२४५४६६५१) आणि ईमेल praiksha.patel@omkaraarc.com बोलीदार वेबसाईट https://bankeauction.com किंवा सेवा पुरवठादार मे सी१ इंडिया प्रा.लि. दू. हेल्पलाईन: +९१-७२९१९८११२४/२५/२६, हेल्पलाईन ई-मेल आयडी: support@bankeauction.com, श्री. भाविक पंड्या, मोबाईल: ८८६६६ ८२९३७, ई-मेल: Maharashtra@c1india.com येथे संपर्क करु शकता. इच्छुक बोलीदारांनी इन्सॉल्व्हन्सी ॲण्ड बँकरप्टसी कोड २०१६ च्या कलम २९ए अंतर्गत डिक्लरेशन द्यावे आणि पालन करावे.**

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
ओमकारा ॲसेटस रिकन्स्ट्रक्शन प्रा.लि.

**दिनांक: २९.१२.२०२३**
**ठिकाण: मुंबई**
**(ओमकारा पीएस/१७/२०२०-२१ ट्रस्टचे एक ट्रस्टी म्हणून त्यांच्या क्षमतेत कार्यरत)**



AXIS BANK LTD.

**नोंदणीकृत कार्यालय :- ॲक्सिस बँक लि., ''त्रिशुल'', 3रा मजला, समर्थेश्वर मंदीर समोर, लॉ गार्डन एलिब्रिज जवळ, अहमदाबाद - 380006.**
**शाखेचा पत्ता - ॲक्सिस बँक लि., तिसरा मजला, गिगाप्लेक्स, एनपीसी -1, टीटीपी इंडस्ट्रीअल एरिया, मुगलासन रोड, ऐरोली, नवी मुंबई - 400708.**

## (नियम ८(१) ताबा सूचना

**ज्याअर्थी, खाली सही करणार ॲक्सिस बँक लि, चे प्राधिकृत अधिकारी या नात्याने वित्तीय प्रतिभूतीकरण व पुनर्रचना आणि प्रतिभूती अंमलबजावणी अधिनियम 2002 च्या अंतर्गत तसेच प्रतिभूती हिताधिकार (येथे ''सांगित कायदा'' म्हणून संदर्भित) आणि सुरक्षा हित (अमलबजावणी)नियमावली 2002 च्या (नियम 3) सह वाचल्या जाणा-या कलम 13(12) अंतर्गत खाली नमूद केलेल्या कर्जदार / गहाणदारांना नोटीसमध्ये नमूद केलेल्या एकूण थकबाकीची परतफेड करण्याची 13 (2) मागणी सूचनेनुसार 60 दिवसांचा आत भरपाई करण्याच्या उद्देश्याने सुचना दिली होती.**

**खाली नमूद कर्जदार / जमानतदार / गहाणदार यांनी खालील नमूद रक्कमेची परतफेड न केल्यामुळे एतद् व्दारा खाली नमूद कर्जदार / जमानतदार / गहाणदार / जमानतदार आणि सर्व सामान्य जनतेला सूचित करण्यात येते की खालील सही करणा-यांनी उक्त नियमावली सह वाचल्या जाणा-या आणि उक्त अधिनियमाच्या कलम 13 उपकलम (4) च्या सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल्स 2002 अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन बँकेस गहाण असलेल्या खालील मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा बँकेने घेतला आहे.**

**विशेष करुन कर्जदार आणि सर्व सामान्य जनतेला एतद् व्दारा वरील संपत्तीच्या विषयी काहीही घेणे देणे न करण्याकरीता ताकीद दिली जात आहे. तसेच पुढील संपत्तीचे व रक्कमेवरील व्याजाचे आणि अन्य खर्चाचे देणेघेणे ॲक्सिस बँक लि,. व्याजासह इतर प्रभाराधिन राहील.सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम 13 मधील उप-कलम (8) मधील तरतुदीसाठी कर्जदाराचे विशेष लक्ष आमंत्रित केले आहे.**

| अ. क्र. | कर्जदार / सह-कर्जदार / गहाणदार / जामीनतदाराचे नाव व पत्ता | थकबाकी रक्कम रु. | मागणी सूचनेची तारिख / ताब्याची तारिख | स्थावर मालमत्तेचे वर्णन |
|---|---|---|---|---|
| 1. | 1) रुपेश सत्यवान पंगेरकर (कर्जदार / गहाणदार), 2) स्मीता रुपेश पंगेरकर (सह-कर्जदार / गहाणदार / जमानतदार / जिपीओए), लोन खाता नं. PHR032701868901 | रु. 58,76,235/- (रुपये अठ्ठावन लाख शहात्तर हजार दोनशे पस्तीस फक्त) 26.05.2022, रोजी देय रक्कम आणि त्यावरील पुढील व्याजासह कराराच्या दराने तसेच पेमेंट केल्याच्या तारखेपर्यंतचे सर्व खर्च, शुल्क आणि खर्च | 31.05.2022 / 29-12-2023 | फ्लॅट नं. सी / 302 तीसरा मजला, बिल्डिंग नं. 34, ''धनलक्ष्मी''या नावाने ओळखली जाणारी, ओम टिजेई वसंत लीला (फेस XII) को-ऑपरेटीव हाऊसिंग सोसायटी लि. वसेत लीला कॉम्प्लेक्स, बेअरींग सर्वे नं. 129, हिस्सा नं. 2(भाग) गाव- कावेसर, दलाल इंजिनीयरिंग च्या समोर, विजय नगरी च्या जवळ, घोडबंदर रोड, कावेसात्रर, ठाणे (पश्चिम)- 4006015 क्षेत्रफळ 885 चौ.फुट बिल्ट अप |

**दिनांक : 29-12-2023**
**ठिकाण : ठाणे**
(मजकुरात संदिग्धता असल्यास इंग्रजी मजकूर ग्राह्य मानावा.)
**अधिकृत अधिकारी, ॲक्सिस बँक लि.**